ISSN 2250-169X

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education For All Subjects

# VISION RESEARCH REVIEW



CHIEF EDITOR


DR. BALAJI KAMBLE

Scanned with OKEN Scanner

ISSN 2250-169X

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education For All Subjects

# VISION RESEARCH REVIEW



CHIEF EDITOR

DR. BALAJI KAMBLE

Scanned with OKEN Scanner

Issue : XXIV, Vol. II
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 6.20
ISSN 2250-169X
Dec. 2022 To May 2023

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | Effect of Annona Squamosa L On Root rot Disease of Mango Mangifera indica Caused by Rhizoctonia Solani<br>**Dr. R. G. Pawar** | 1 |
| 2 | Country of Origin – Consumers' perception at the point of purchase- A study of buyer behavior<br>**Dr. Rahul S. Kharabe** | 6 |
| 3 | Translation of Anna Bhau Sathe's Short story 'Erene Gadhav Khale' from Marathi into English with Thematic Analysis<br>**Dr. Sunil Raosaheb Raut** | 15 |
| 4 | Study of Effect of Gadolium and Zinc substitution on susceptibility Magnesium ferrites<br>**S. A. Masti** | 26 |
| 5 | A Brief Study of Training for Effective Running<br>**Dr. S. R. Bhosale** | 32 |
| 6 | राजनैतिक समझ विकसित करती हिंदी फ़िल्में<br>**डॉ. शालू देवी** | 39 |
| 7 | कृषी उत्पन्न बाजार समितीचे शेतकऱ्यांच्या विकासातील योगदान<br>**ज्ञानोबा व्यंकटराव मुंढे, डॉ. एल.एच. पाटील** | 44 |
| 8 | ड्रॅगनफ्रुटचे आरोग्यदायी फायदे<br>**डॉ. मिलन गावंडे** | 48 |
| 9 | महात्मा फुले यांचा सामाजिक सांस्कृतिक संघर्ष<br>**प्रतिभा कृष्णराव आवंडकर** | 53 |
| 10 | भारतीय संस्कृतीतील भाषिक सौंदर्याचा शोध<br>**डॉ. गौतम झरिबा ढवळे** | 60 |
| 11 | लोकहितवादी आणि स्त्रीवाद<br>**डॉ. सुनिल राठोड** | 65 |


Scanned with OKEN Scanner

9

# महात्मा फुले यांचा सामाजिक सांस्कृतिक संघर्ष

**प्रतिभा कृष्णराव आवंडकर**
मराठी विभाग,
श्रीमती राधाबाई सरडा महाविद्यालय,
अंजनगाव सुर्जी, अमरावती

## Research Paper - Marathi

भारतीय समाजातील शैक्षणिक व्यवस्थेविरुद्ध संघर्ष करणाऱ्या फार प्राचीन काळी चळवळी अस्तित्वात आलेल्या होत्या. अन्यायाची व्यवस्था मोडून काढण्यासाठी आणि सर्वसामान्य लोकांना सर्व बाजूंनी फुलण्याची संधी मिळावी म्हणून आपले सर्व आयुष्य खर्ची घालणाऱ्या अनेक महान व्यक्ती वेळोवेळी आपल्या समाजात जन्माला आल्या आहेत. आपण भूतकाळात फार मागे न जाता, केवळ आधुनिक काळाचा विचार करायचे म्हटलं. तर आपल्या समाजातील रंजल्या गांजल्या लोकांना अंधारातून प्रकाशाकडे आणण्याची क्रांतिकारक कार्य महात्मा फुले यांनी केले हे विख्यातच आहे. महात्मा फुले यांचे चरित्र ,कार्य, साहित्य इत्यादींचा सखोल अभ्यास करणारे अनेक साहित्यिक महाराष्ट्रात आहे, असे असले तरी या साहित्यकांमध्ये महात्मा फुले यांच्या जीवन कार्याचे समाजाला यथार्थ रीतीने दर्शन घडविणारे असे अत्यंत ताकदीचे निवडक मोजकेच असे अभ्यासक आहेत. अशाच काही साहित्यिकांचा त्यांच्या साहित्याचा आढावा घेतला असता त्यांनी महात्मा फुले यांनी केलेल्या कार्याचा विचार अत्यंत ताकदीने मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

भारतीय समाजामध्ये शोषक आणि शोषित यांच्यामध्ये संघर्ष फार प्राचीन काळापासून चालत आला आहे. येथील अन्याय अशा प्रस्थापित व्यवस्थेला आधुनिक काळात महात्मा फुले यांनी आपल्या धारदार शब्दांनी आव्हान दिले होते तसेच प्रत्यक्षात ते अमलातही आणण्याचा प्रयत्न केला.

"आधुनिक महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाचे अग्रदूत म्हणून महात्मा फुले यांचे नाव घेतल्या जाते" महात्मा फुले म्हणतात," मनुष्य सर्व प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ आहे. यामध्ये स्त्री श्रेष्ठ आहे. महिला आणि पुरुष जन्मापासून मुक्त आहे म्हणूनच दोन्ही अधिकाऱ्यांना समान हक्क उपभोगण्याची संधी मिळाली पाहिजे"

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याचा आढावा घेतला असता, खालील घटनांवरून त्यांच्या कार्याची व्यापकता व सांस्कृतिक संघर्षाची पाळमुळे यांना महात्मा फुले यांनी कसे तोंड दिले हे

Scanned with OKEN Scanner

दिसून येते.

आधुनिक महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाचे अग्रदूत महात्मा फुले यांच्या जीवनातील काही घटनांचा अभ्यास केला असता त्यांच्या विचारांची महाराष्ट्राला नव्हे संपूर्ण भारताला किती गरज होती याची जाणीव आपल्याला झाल्याशिवाय राहत नाही.

१) महात्मा ज्योतिबा फुले अंदाजे एक वर्षाचे असताना त्यांची आई वारली आणि त्यांचे पालन पोषण त्यांच्या वडिलांनी केले.

२) महात्मा ज्योतिबा फुले हे थॉमस पा ईन या विचारवंताच्या विचाराने प्रभावित झाले होते थॉमस पॉइंन यांचे प्रसिद्ध पुस्तक 'द राइट्स ऑफ द मेन,'यामध्ये अधिक रस घेतला होता.

३) वयाच्या २२ व्या वर्षापर्यंत पुणे येथीलच नव्हे तर लंडन पर्यंत एक प्रसिद्ध हस्ती महात्मा फुले बंदी होती. कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांनी लंडन येथे त्यांच्या कामाचा स्वीकार केला होता.

४) ज्योतिबा फुले यांनी ब्राह्मणांना दिलेल्या जाणा?या दक्षिणा याचा विरोध केला होता. १८४८ ते १८४९ मध्ये दक्षिणांमध्ये चार हजार रुपयाची राशी. होती. या प्रथे विरुद्ध उभे राहून उभे राहून मागणी केली आणि त्यांनी अस्पृश्यांसाठी शिक्षणासाठी या धनाचा उपयोग केला पाहिजे असे इंग्रज सरकारला सांगितले. ब्राह्मणांना मिळणारी दक्षिणा कमी असल्यामुळे अगोदरच ब्राह्मण ब्रिटिश सरकारवर नाराज होते आणि आता एक बावीस वर्षाचा शूद्र पण ब्राह्मणांना आव्हान करत आहे आज पर्यंत ब्राह्मणांच्या वर्चस्वाला कोणीच आव्हान केले नव्हते. शेवटी ब्रिटिशांनी भारतामध्ये प्रथमच अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी पहिली मदत केली याची नोंद केली जाते.

५) एका स्कॉटिश शाळेमध्ये१८८४ ज्योतिबा फुले शिक्षक म्हणून काम केले.

६) १८८९ मध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांना लकवा गेला त्यामुळे त्यांचा उजवा हात निकामी झाल्यामुळे त्यांना लिहिता येत नव्हते परंतु दलितांच्या बद्दल महात्मा ज्योतिबा फुले यांच्या मना इतकी समभूती होती की त्यांनी डाव्या हाताने अतिशय मेहनतीने "सार्वजनिक सत्य धर्म" हा ग्रंथ पूर्ण केला.

७) १८८५ महात्मा ज्योतिबा फुले यांनी शूद्र जातीच्या लोकांना सांगितले की, त्यांनी आपली कर्मकांडे आणि धार्मिक विधी स्वतःच आयोजित करून घ्यावी की, ज्यामुळे ब्राह्मणांना त्यांची पुजारी म्हणून असणारी भूमिका निरर्थक केल्या जाईल.

८) ज्योतिबा फुले ब्राह्मणवादाच्या विरोधात होते आणि 'वेदांना त्यांनी 'बेकार असणाऱ्या कल्पना' खोटया कल्पना असे मानले होते.

Scanned with OKEN Scanner

Issue : XXIV, Vol. II
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 6.20
ISSN 2250-169X
Dec. 2022 To May 2023

९) १८५६ मध्ये ब्राह्मणांनी महात्मा फुले यांना मारण्याचा प्रयत्न केला होता, कारण महात्मा फुले बहुजन समाजाला शिक्षण देत होते.

१०) ११ मई१८८० या दिवशी ज्योतिबा फुले यांना मुंबई देशात 'मराठा ज्ञान धर्म संस्था' मध्ये ,'महात्मा' ची उपाधी दिली.

११) ५ फेब्रुवारी १८५२ मध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्वतःच्या शिक्षण संस्थांना करिता सरकारला आर्थिक सहाय्यता ची मागणी केली.

१२) समाजामध्ये अस्पृश्यांची सावलीसुद्धा अपवित्र मानल्या जात होते त्यांना तहानलेल्या अस्पृश्यांना पाणी देण्यास कोणी तयार नव्हते. महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी आपल्याच घरामध्ये अस्पृश्यांसाठी विहीर खोदली. आपल्या घरातील विहिरी मधून पाणी नेण्यास मुभा दिली.

१३) २८ जानेवारी१८५३ रोजी फुले युगल द्वारा भारतामध्ये पहिले शिशु अनाथालय निर्माण केले.

१४) १८६३ मध्ये महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पहिले अनाथालय सुरू केले. या अनाथालयामध्ये विधवा यांना सुरक्षितता प्रदान करण्यात आली समाजामध्ये मान्यता नसतांना सुद्धा प्रवाहाच्या विरोधात जाऊन महात्मा फुले यांनी कार्य केले

१५) २४ सप्टेंबर१८७३ ला ज्योतिबा फुले यांनी आपल्या अनुयायांची आणि आपल्या प्रशंसकाची बैठक बोलावली 'सत्यशोधक समाज '(सोसायटी ऑफ सिकर्स ऑफ ट्रूथ) यांचे गठन करून निर्णय घेतला. महात्मा फुले सत्यशोधक समाजाचे पहिले अध्यक्ष आणि कोषाध्यक्ष बनले.

१६) १६ नोव्हेंबर १८५२ ला मेजर कॅन्डी यांनी महात्मा फुले यांनी शिक्षण क्षेत्रात चांगली कामगिरी केली म्हणून त्यांचा सन्मान केला.

१७) प्रेसच्या स्वतंर्त्यासाठी महात्मा फुले उभी राहिले ३० नोव्हेंबर १८८० ला पुणे महानगरपालिका चे अध्यक्ष यांनी भारताचे गव्हर्नर जनरल लॉर्ड लिटल यांच्या भेटीसाठी सदस्यांपासून एक हजार रुपये खर्च करण्यासाठीचा प्रस्ताव मंजुरीला महात्मा फुले यांनी विरोध केला.

१८) सर्वात महत्त्वाचे म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्वतःच्या पत्नीला सावित्रीबाईंना शिकवून भारतातील पहिली शिक्षिका नव्हे तर पहिली मुख्याध्यापिका म्हणून मुलींच्या शिक्षणाला सुरुवात केलेली आहे. आज मुली शिकत आहेत .

**महात्मा फुले आणि सांस्कृतिक संघर्ष :**

वरील घटनांचा अभ्यास करत असताना असे दिसून येते की, महात्मा फुले यांनी सामाजिक असंतोषाला वाचा फोडण्याची काम केले त्याच बरोबर सांस्कृतिक संघर्षाला सुद्धा

सुरुवात केलेली आहे बाळ गांगल यांचे दोन लेख ४/१२/८८व ११/१२/८८

पहिला लेख 'शिवाजी महाराजांना शिव्या देणाऱ्या या महात्म्याचे महात्म्य तपासून पहा,'. दुसरा लेख'हा कसला महात्मा-फुले म्हणणारी ही केवळ दुर्गंधी'या लेखातील विचार एकांगी, तर्कदृष्ट आहे शिवाय लेखकाची अभिरुची ही स्पष्ट करणारे आहे. बाळ

गांगलांनी क्रांतीबा फुले यांच्या कार्याचा अन्वयार्थ नेमका कसा लावलाय? त्यांची भूमिका काय? याचा विचार करणे गरजेचे आहे.

बाळ गांगल यांनी फुले यांच्यावर लिहिलेला लेख संशोधनात्मक नव्हता तो पूर्वग्रह दूषित होता. पूर्वग्रह दूषितेमुळे केलेले लेखन एकांगी आणि उथळ होते संशोधकाची भूमिका घेऊन फुले यांच्या विचारांची चिकित्सा करण्या ऐवजी प्राचीन व प्रथा परंपरांच्या भूतांनी झपाटल्यामुळे त्यांनी हे लेखन केले.

महात्मा फुले यांचे जीवनामधील वरील घटनांचा अभ्यास केला यामुळेच त्यांना आधुनिक महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाचे अग्रदूत म्हणून क्रांतीबा फुले यांच्या नावावर इतिहासानेच आणि शिक्कामोर्तब केले. ही आज वस्तुस्थिती आहे.

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीतील विचार प्रवाहांचे आणि घटनांचे आकलन गांगलांना फारसे नसल्याने त्यांचे विवेचन एकांगी आणि कमालीचे बालिश होत गेले आहे.

**मराठ्यांना फुलें विरुद्ध चीथवण्याचा प्रयत्न :**

महात्मा ज्योतिबा फुले यांनी १८६९ 'छत्रपती शिवाजीराजे भोसले'यांचा पोवाडा प्रसिद्ध केला. या पोवाड्यामध्ये महात्मा फुलेंनी छत्रपती शिवाजी, जिजामाता, दादोजी कोंडदेव यांच्या बद्दल मते मांडली. त्यामागील भूमिका समजून न घेता तिचा चुकीचा अन्वयार्थ लावून शिवछत्रपतीच्या अनुयायांच्या मनात महात्मा फुलें विषयी संतापाची भावना निर्माण करण्याचा निंद्य प्रयत्न गांगल यानी ४/१२/१९८८ च्या लेखात केलेला आहे.

जो बहुजन समाज महात्मा फुलेंना युगपुरुष मानतो त्यांच्या धर्म भावनेला आवाहन करून फुलांच्या विषयी बहुजन समाजात विष पेरण्याचा गांगल यांनी प्रयत्न केला हे सहज लक्षात येते. महात्मा फुले यांच्या विचारांची चिकित्सा न करता द्वेषबुद्धी व्यक्त करणे, महात्मा फुले म्हणजे विद्या वैरी, घाण चिवडणारा महात्मा, स्वजनांवर सतत भुंकत राहणारा, महात्मा नावाचं घाणेच बोचक, महाराष्ट्रातील परस्पर द्वेषाची गटार गंगेची गंगोत्री, अभ्यासाशी वाकडं आणि विद्वत्तेची वैर असणारा महात्मा, बालिश बुद्धिवाद करणारा, शिव्यांचा प्रचंड साठा असणारा, कोपरापर्यंत घाणीत हात बुडवून ती ढवळून काढणारा, शिव्यांचा प्रचंड साठा असणारा, कोपरापर्यंत घाणीत हात बुडवून ती ढवळून काढणारा, शिव्यांचा प्रचंड साठा असणारा, ज्ञान आणि अर्जित विद्वत्ता नसणारा, उपजत बुद्धी नसणारा, गलीच्छ लेखन करणारा, खिश्चन पादऱ्यांनी आणि ब्रिटिश फूटपाडयांनी छू केल्यावर

Scanned with OKEN Scanner

स्वजनांवर जीव तोडून भुंकत राहणारा, इत्यादी इत्यादी महात्मा फुले यांच्या विचारांची चिकित्सा करण्याऐवजी त्यांच्याविषयी द्वेषबद्धी व्यक्त करणे एवढाच गांगलांचा दुष्ट हेतू यातून स्पष्ट होतो.

बाळ गांगल हे एकटेच महात्मा फुले यांना बोलणारे नव्हते किंवा लिहिणारे नव्हते त्यांच्या दृष्टीने फुले म्हणजे स्वजन घातकी, स्वदेश घातकी ,स्वधर्म घातकीआणि पारधार्जीने ठरतात, महात्मा फुले यांचे पुनर्विमुल्यांकन गांगलांनी करावे एवढी त्यांची योग्यता नाही. त्यांचा राग प्रवृत्तीवर होता, कोणत्याही जातीवर नव्हता हे गांगल यांनी फुले चरित्र वाचून समजून घ्यायला हवे होते.

इसवी सन १७१५ ला पेशव्यांनी ब्राह्मणांना दक्षिणा देण्यासाठी ,'रमणा' नावाची इमारत बांधली. या रमण्यात शेकडो ब्राह्मण दक्षिणेसाठी जमा होत. तेव्हा इतर लोक त्या रमण्याऐवजी प्रदक्षणा घालत असत. कारण इतक्या ब्राह्मणांना प्रदक्षणा घातली म्हणजे पृथ्वी प्रदक्षिणेचे पुण्य पदरी पडते अशी समजूत रूढ झाली होती विशिष्ट वर्णाच्या भल्यासाठी राबवत असणारी पेशवाई आणि ते राबवणारे पेशवे मुठभरांच्या दृष्टीने चांगले ठरतील परंतु ही पेशवाई बहुसंख्यांकावर अनेक प्रकारचे अन्याय अत्याचार करीत होती त्या व्यवस्थेबद्दल आणि व्यवस्था रक्षकांबद्दल ज्यांच्यावर अन्याय होतो त्यांनी स्तुती सुमने उधळावी अशी अपेक्षा करणे निर्बुद्धपणाचेच म्हणावे लागेल.

**शेतकऱ्यांच्या दुःस्थिती विषयी विचार-**

१९ व्या शतकातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अत्यंत भयावह होती. उच्चवर्णीय मोठ्या जमीनदारांकडे त्यांना कामे करावी लागत त्यांचा योग्य मोबदला त्यांना मिळत नसायचा शिवाय सामान्य शेतकरी हा देवधर्म, नवससायास यांच्या दृष्टचक्रात सापडलेला होता. अनेकांच्या जमिनी सावकारांनी अल्प पैशात गिळंकृत केल्या होत्या. कोर्ट कचेरीत उच्चवर्णीय असल्याने त्यांना तिथूनही न्याय मिळणे कठीण झाले होते . शिक्षण देण्याचा विचारही त्यांच्या मनाला शिवत नाही रूढी परंपरांच्या नावाखाली कर्ज काढून भट ब्राह्मणांना दक्षिणा दिली जात असायची. मुळातच अडाणी असल्यामुळे सावकाराने केलेल्या कागदावर अंगठा मात्र निमुटपणे केला जायचा. त्यामुळे कर्ज घेतलेली रक्कम किती आहे? किंवा आपण काय लिहून दिले? याचेही भान शेतकऱ्यांना नसायचे त्यामुळे धार्मिक व आर्थिक या दोन्हीही दृष्टीने शेतकरी संपूर्ण नागावला जात होता

या शेतकऱ्याच्या दुःखाला व त्याच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम फुले यांनीच केले . समाजातील जो जो उपेक्षित दुर्लक्षित घटक होता तो तो फुलांच्या आस्थेचा विषय झाला आहे. शेतकऱ्यांच्या शोषणावर व दुःखावर विदारक प्रकाश टाकणारा मराठी साहित्यातील पहिले ग्रामीण साहित्य 'शेतकऱ्यांचा असूड' (१८८३) या नावाचा ग्रंथ ही त्यांनी लिहिला.

शेतकऱ्यांच्या शोषणात जसा शेठ सावकारांचा शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा अंतर्भाव खुली करतात त्याचप्रमाणे ढोंगी ब्राह्मणी ग्रंथांचाही ते अंतर्भाव करतात, या धर्मग्रंथांमधून निरनिराळी

व्रतवैकल्ये. आणि ब्राह्मणांना दक्षिणा देण्याबद्दल सांगितलेले असते. त्याबद्दल फुले म्हणतात," अक्षरशून्य शेतकऱ्यास धर्म मिषाने इतके नाडतात, त्याच विषयी या जगात कुठे या मासल्याचा पडसा सापडणे कठीण आहे. वी च्या धूर्त आर्य ब्राह्मण ग्रंथकारांनी आपली मतलबी धर्माचे लिगाड शेतकऱ्याच्या मागे इतके सफाई ने लावले की शेतकरी येण्याचे पूर्वी त्याचे आईस ज्यावेळेस ऋतू प्राप्त होतो तेव्हा तिच्या गर्भधानादी संस्कारापासून तो हा मरेपर्यंत कित्येक गोष्टींनी लुटल्या जातो इतकेच नव्हे तर हा मेला तरी याच्या मुलास श्राद्ध वगैरेच्या मीषाने धर्माचे ओझे सोसावे लागते.

धर्मभावनेमुळे अनेक सणावारांना लुटले जाते एवढेच कमी पडत नाही तर बद्रिकेदार वगैरे तिथे यात्रेचे नादी लावून काशी प्रयाग ला नेऊन हजारो रुपयास नागवून त्यांच्या दाढी मिशा बोडून त्यास त्यांचे घरी आणून पोहोचवितात व शेवटी मावंदाचे निमित्ताने मोठमोठाली ब्राह्मण भोजने घेतात. शेतकऱ्यांच्या आर्थिक व मानसिक गुलामगिरीचे फुलेंनी केलेले निदान अत्यंत अचूक आहे.

**शेतकऱ्यांच्या दुखस्थितीवर सुचवलेले उपाय:**

१) शेतकऱ्यांनी धर्मग्रंथांच्या मानसिक गुलामगिरीतून मुक्त झाले पाहिजे.
२) शेतकऱ्यांनी ऋण काढून सण साजरा करायची प्रवृत्ती सोडली पाहिजे.
३) लग्नप्रसंगी खर्चात कपात केली पाहिजे.
४) शेतकऱ्यांच्या मुलांनी शाळा शिकले पाहिजे. त्याशिवाय पर्याय नाही.
५) अक्षरशत्रुत्वामुळे शेतकरी शेठ सावकाराकडून नाडल्या जातो त्यामुळे त्यांनी शिक्षण शिकायला सुरुवात केली पाहिजे.
६) लहानपणी मुला मुलींचे लग्न करू नये
७) व्यसनापासून दूर राहून नीतिमान बनले पाहिजे.

अशाप्रकारे सांस्कृतिक संघर्षा मधून महात्मा फुले यांनी आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण केली महात्मा फुले यांचा सत्यधर्म 'नवसमाजाचे गॅझेट 'होय कसे शरण कुमार लिंबाळे यांनी म्हटले.

'एकंदर सर्व मानवी स्त्री पुरुष, धर्म, गाव की, व मुलकी या संबंधाची प्रत्येक मानवाची स्वतंत्रता, मालमत्ता, संरक्षण आणि त्यांचा जुलमापासून बचाव करण्याविषयी जे कोणी बाध आणत नाहीत त्यास सत्य वर्तन करणारे म्हणावे'असे महात्मा फुले म्हणतात महात्मा फुले यांनी व्यक्ती विकास, व्यक्ती स्वातंर्त्य, या कल्पनांचा आवर्जून पुरस्कार केला आहे. महात्मा फुले हे काळाच्या आरपार पाहणारे द्रष्टा पुरुष होते. एकोणिसाव्या शतकात मांडलेला विचार

**"विद्येविना मती गेली**
**मतीविना गती गेली**
**गती विना वित्त गेले**
**वित्त विना शूद्र खचले**
**एवढे अनर्थ एका अविद्येने केले"**

Scanned with OKEN Scanner

आजही २१ व्या शतकात हा विचार काल बाह्य झाला नाही.यातच महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांची ताकद दिसून येते.

## संदर्भ सूची :-


१) सांस्कृतिक संघर्ष डॉक्टर शरण कुमार लिंबाळे दिलीप राज प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड

२) धनंजय कीर : महात्मा ज्योतिराव फुले; आमच्या समाजक्रांतीचे जनक

३) धनंजय खीर : स गं मालशे (संपादक): महात्मा फुले समग्र वांग्मय

४) धनंजय कीर : महात्मा ज्योतिराव फुले

५) रा श वाडींबे : महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना

६) ज्योतिराव गोविंदराव फुले : सार्वजनिक सत्यधर्म

७) डॉक्टर श्रीराम गुंदेकर : महात्मा ज्योतिबा फुले : साहित्य आणि साहित्य मूल्ये


Scanned with OKEN Scanner